International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 19 March - April - 2025

# स्टार्ट अप इंडियाच्या माध्यमातून विकसित भारत-२०४७

**प्रा. एस. एस. कोळी**

*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग*

*रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, (स्वायत्त) श्रीरामपूर.*

***Corresponding Author – प्रा. एस. एस. कोळी***

**DOI - 10.5281/zenodo.15140484**

***गोषवारा :***

*भारत देशाचे पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट 2015 रोजी स्टार्ट अप इंडिया ची घोषणा केली. स्टार्ट अप इंडिया ही योजना सुरू करण्याचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे देशात नवीन उद्योजकाला प्रोत्साहन देण्याबरोबर रोजगारात वाढ घडून आणणे हा आहे. आज लोकसंख्या ज्या वेगाने वाढत आहे त्या वेगाने नवीन उद्योगाची स्थापना होताना पर्यायाने रोजगारात वाढ होताना दिसत नाही. अशावेळी भारत देशाला मजबूत बनवण्यासाठी नवनिर्मितीला चालना देण्याबरोबरच शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी आणि देशात वाढणारी बेकारी कमी करून रोजगारात वाढ घडवून आणण्यासाठी स्टार्ट अप इंडियाची भूमिका महत्त्वाची आहे.*

**प्रस्तावना:**

स्टार्ट अप इंडिया ची घोषणा माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट 2015 रोजी दिल्ली येथील लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी केली. प्रत्यक्षात या योजनेची सुरुवात 16 जानेवारी 2016 ला करण्यात आली. भारतासारख्या विकसनशील देशात नवीन उद्योगाची संख्या वाढवण्यासाठी दारिद्र्य, बेकारी, विषमता, रोगराई कमी करण्यासाठी त्याचबरोबर नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करून रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. आज सुद्धा देशातील लोक रोजगारासाठी सरकारवर अवलंबून आहेत. लोकांची ही प्रवृत्ती कमी करण्यासाठी रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी भारत सरकार स्टार्ट अप इंडिया च्या माध्यमातून आर्थिक विकासातील अडथळे दूर करण्यासाठी योग्य उपाययोजना करत आहे. विकसित भारत 2047 हे लक्ष्य साध्य करण्यासाठी स्टार्ट अप इंडिया ही एक महत्वपूर्ण योजना ओळखली जाते.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1. स्टार्ट अप इंडिया चा अर्थ समजावणे.
2. स्टार्ट अप इंडिया योजनेचा उद्देश समजावणे.
3. स्टार्ट अप इंडिया ची वैशिष्ट्ये लक्षात घेणे.
4. स्टार्ट अप नोंदणीसाठी पात्रता लक्षात घेणे.
5. स्टार्ट अप इंडिया योजनेसाठी ऑनलाईन अर्जासाठी लागणारे कागदपत्रे कोणती ते लक्षात घेणे.

**स्टार्ट अपचा अर्थ:**

स्टार्टअप या संकल्पनेचा अर्थ 'उद्‌मारंब' असा आहे. गेल्या काही वर्षात देशातील तरुणांना एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आकर्षित केलेले असून ती महत्त्वाची संकल्पना म्हणजे स्टार्ट अप इंडिया होय. 'एका ठराविक गोष्टीला गती देण्यासाठी केलेली कृती म्हणजे स्टार्टअप होय'. असा त्याचा अर्थ सांगता येईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, नवीन कल्पनेवर आधारित कोणत्याही व्यवसाय निर्मिती पासून ते प्रत्यक्षात येईपर्यंतची प्रक्रिया म्हणजे स्टार्टअप होय. स्टार्ट अप ची सुरुवात नेमकी कशी झाली हे सांगणे अवघड असले तरी ' Silicon Valley Fever' नावाच्या पुस्तकात स्टार्टअपची उत्पत्ती 1976 मध्ये झाल्याचे म्हटले आहे. फोर्स्बच्या एका लेखात सुद्धा स्टार्टअप हा शब्द 1976 मध्ये प्रथम वापरल्याचे दिसून येते. विकसित भारत 2047 हे लक्ष्य गाठण्याच्या उद्देशातून स्टार्ट अप इंडिया ही एक महत्वपूर्ण योजना म्हणून या योजनेचा उल्लेख करता येईल. भारतात सुरुवातीच्या काळात पेटीएम, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, झेम्याटो, ओला, उबेर यासारखे स्टार्टअप पुढे आले आहेत. आज या सर्वांची प्रेरणा घेऊन देशात मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहेत.

**स्टार्टअप इंडिया योजनेचा उद्देश:**

1. भारतातील नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे.
2. देशात रोजगार निर्मिती घडून आणणे.
3. स्टार्ट अप इंडिया च्या माध्यमातून बौद्धिक व तंत्रज्ञान मालमत्तेच्या आधारावर नवनवीन उत्पादने व सेवांचे व्यापारीकरणाला प्रोत्साहन देणे.
4. देशातील महिला उद्योजकांची क्षमता वाढवण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन अभ्यासक्रम चालवणे.
5. महिलांना उद्योजकांना कायदेविषयक, करविषयक आणि आर्थिक सल्ले देणारी यंत्रणा निर्माण करणे.

**स्टार्टअप इंडिया योजनेची वैशिष्ट्ये:**

1. देशातील उद्योजकासाठी असणारे सरकारी नियम आणि बंधने कमी करणे.
2. उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे परवानापद्धतीतील अडथळे दूर करणे.
3. परकीय गुंतवणुकीतील अडथळे दूर करणे.
4. देशात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी शाश्वत आर्थिक वृद्धीला चालना देणे.

**स्टार्टअप नोंदणीसाठी पात्रता:**

1. कंपनीने खाजगी मर्यादित कंपनी किंवा मर्यादित उत्तरदायित्व कंपनी तयार करावी.
2. कंपनीला औद्योगिक धोरण व विभागाकडून मान्यता मिळाली पाहिजे.
3. कंपनी नवीन असली पाहिजे परंतु पाच वर्षापेक्षा जुनी नसावी.
4. कंपनीची वार्षिक उलाढाल 25 कोटी पेक्षा जास्त नसावी.
5. कंपनीकडे नाविन्यपूर्ण उत्पादने असावीत.

**योजनेसाठी लागणारी कागदपत्रे:**

स्टार्ट अप इंडिया या योजनेसाठी ऑनलाईन अर्जासाठी लागणारी कागदपत्रे पुढील प्रमाणे आहेत.

1. आपल्या कंपनीचे नाव, स्थापना आणि नोंदणीची तारीख
2. पॅन तपशील, पत्ता, पिनकोड आणि राज्य

3. अधिकृत प्रतिनिधी, संचालक आणि भागीदार यांचा तपशील

**संशोधन पद्धती:**

विकसित भारत 2047 आणि स्टार्ट अप इंडिया चा अभ्यास करण्यासाठी विविध वर्तमानपत्रे विविध अहवाल मासिके पुस्तके इंटरनेट यासारख्या दुय्यम संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

स्टार्ट अप इंडिया या योजनेच्या माध्यमातून विकसित भारत 2017 हे लक्ष गाठण्यासाठी नवीन उद्योग निर्मितीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्याबरोबरच वाढती बेकारी कमी करून रोजगार निर्मिती दर्जेदार शिक्षण व आरोग्य व्यवस्था सामाजिक व आर्थिक विषमता कमी करणे शाश्वत विकास पर्यावरणाचा ऱ्हास त्याचबरोबर आर्थिक वृद्धी करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**

1. https:/ www.startupindia.gov.in/
2. https://www.google.com/search
3. विविध योजना मासिके व वर्तमानपत्रे
4. व्यवसाय व्यवस्थापन (ऑगस्ट 2021), प्रशांत पब्लिकेशन जळगाव.
5. भारतीय अर्थव्यवस्था (जानेवारी 2022), भगीरथ प्रकाशन.